ZPAHM-11015(11)/19/2025-DYCEOG

मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे न्यायालयात दाखल पुनरिक्षण अर्जावरील आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-४ /१८०/४४७/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा - १. सहा. आयुक्त चौकशी, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील विभागीय चौकशी अहवाल क्रं. विशा-४/खाचौ/सीआर-२२८/२०१८ दि. ०६/०२/२०१९

२. सहा. आयुक्त चौकशी, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील विभागीय चौकशी अहवाल पत्र क्रं.विशा-४/खाचौ/सीआर-१६/२०१९ दि. २९/०६/२०१९

३. कार्या आदेश क्रं साप्रवि-१/अ-४/१८३/२०१८ दि. १३/०४/२०१८

४. अंतिम कारणे दाखवा नोटीस पत्र क्रं साप्रवि-१/अ-४/३६०/१९ दि. २४/०७/२०१९

५. कार्यालयीन आदेश क्रं.साप्रवि-१/अ-४/४०५/२०१९ दि.०७/०९/२०१९

६. अपर आयुक्त नाशिक विभाग,नाशिक यांचेकडील अपील अर्ज क्र.१५८/२०१९ ,जा.क्र. १७४४६ दिनांक १२/०८/२०२१

७. कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र. डिएनई २०२६/प्र.क्र. ४७/आस्था-१२ दि. १७/०७/२०२६ रोजीचे पत्रासोबत मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांनी पारित केलेले दि.१०/०७/२०२६ रोजीचे आदेश

श्री. निमसे रमेश शिवाजी , परिचर हे प्रा. आ. के शेंडी ता. अकोले येथे कार्यरत असतांना दि. ०१/११/२०१७ ते दि. १०/१२/२०१७ अखेर एकुण ४० दिवस व दि. २३/१२/२०१७ पासुन रजेचे कोणतेही आवेदन सादर न करता विनापरवानगी स्वत:च्या अधिकारात अनाधिकृत गैरहजर राहिल्याने आरोप सिध्द झाल्याने संदर्भ क्र.०३ अन्वये श्री. निमसे, परिचर यांच्या पुढील वेतनवाढ भावी काळातील वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने चार वर्षासाठी रोखण्याची शिक्षा करण्यात आली आहे. तसेच दि.१३/०३/२०१८ ते २७/०९/२०१८ अखेर विनापरवानगी गैरहजर असल्याने संदर्भ क्र.०५ अन्वये समयश्रेणीतील निम्नस्तरावर आणणेची शिक्षा करण्यात आली होती.

प्रकरणी श्री निमसे रमेश शिवाजी, परिचर यांनी संदर्भ क्र.०५ अन्वये देण्यात आलेल्या शिक्षेच्या आदेशाविरुध्द मा. अपर आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांचेकडेस अपील दाखल केले सदर अपीलाचे सुनावणीकामी श्री निमसे, परिचर हे दि.१४/०२/२०२०, दि. २३/१०/२०२०, दि.२२/०१/२०२१, दि.२६/०३/२०२१ व दि.३०/०७/२०२१ रोजी अनुपस्थित राहिल्याने तसेच त्यांचा तोंडी अथवा लेखी युक्तिवाद केलेला नसल्याने संदर्भ क्र.०६ नुसार श्री निमसे, परिचर यांचे अपील विनाचौकशी कामकाजातून काढुन टाकण्यात आलेले आहे.

उक्त नमूद शिक्षेच्या आदेशाने तसेच अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील संदर्भ क्र.०६ चे आदेशाने व्यथित होऊन श्री रमेश शिवाजी निमसे, परिचर, पंचायत समिती जामखेड यांनी मा. राज्यमंत्री (ग्रामविकास विभाग), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे न्यायालय यांचेकडेस अपील अर्ज दाखल केलेला आहे. सदर अपील अर्जावर दिनांक ०८/०४/२०२६ रोजी सुनावणी पार पडलेली आहे. सदर सुनावणीचे अनुषंगाने मा. राज्यमंत्री

(ग्रामविकास) यांनी पारित केलेले दि.१०/०७/२०२६ रोजीचे आदेशान्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९६४ मधील नियम २१ नुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात आलेले आहेत.

१. अपीलार्थी श्री रमेश शिवाजी निमसे यांचा सदर अपील अर्ज अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे आदेश दिनांक १३/०४/२०१८ व दिनांक ०७/०९/२०१९ तसेच अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचा आदेश दिनांक १२/०८/२०२१ याव्दारे रद्द करण्यात येत आहे.
३. अपीलार्थी यांचेवरील दिनांक १३/०४/२०१८ व दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे आदेशामधील शास्ती रद्द करुन त्याऐवजी पुढील दोन वेतनवाढी कायमस्वरुपी परिणाम न होता तात्पुरत्या स्वरुपात रोखणे अशी सुधारित शास्ती लागू करण्यात येत आहे.
४. अपीलार्थी यांचा संबंधित गैरहजेरीचा कालावधी त्यांच्या खात्यावर शिल्लक असलेल्या अर्जित व वैद्यकीय रजेमधून वजा करुन नियमित करण्यात यावा.
५. अपीलार्थी यांचा निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी समजण्यात यावा.
६. या सुधारित शास्तीनुसार अपीलार्थी यांच्या वेतनाची पुनर्रचना करण्यात यावी आणि नियमानुसार अनुज्ञेय असणारा वेतनाचा सर्व फरक त्यांना अदा करण्यात यावा.
७. सदर सुधारित आदेशाची नोंद अपीलार्थी यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक -----202608100401142------ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 10-08-2026 21:43:05
आनंद भंडारी, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री रमेश शिवाजी निमसे, परिचर, पंचायत समिती जामखेड,
व्दारा व प्रत — गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड
२/- सदरचा आदेश श्री निमसे यांना बजावणेत येवून दिनांकित पोहोच आणि सदर आदेशाची नोंद मूळ सेवापुस्तकात घेणेत येवून नोंद घेतलेल्या मुळ सेवा पुस्तकातील पृष्ठाची छायांकित सत्य प्रत या कार्यालयास उलटटपाली सादर करावी.
प्रत — अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
प्रत — मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.